**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. २३/२०१६-१७/१८८ दिनांक: १६-११-२०१६

**<u>आदेश</u>**

**आदेश केस क्र. २३/२०१६-२०१७**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. रामचंद्र बाळू सुतार :<br>मु. पो. गौरवाड<br>ता. शिरोळ, जिल्हा. कोल्हापूर | **तक्रार<br>अर्जदार<br>(ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, जयसिंगपूर | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग शिरोळ | |

**कोरम:-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहे.

१) तक्रारदार श्री रामचंद्र बाळू सुतार रा. गौरवाड ता. शिरोळ जि. कोल्हापूर हे घरगुती वीज ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्र. २५२७२१११३१३१ असा आहे. त्यांना जानेवारी २०१२ पासून मार्च-२०१६ पर्यन्त शून्य वीज वापराची देयके मिळत होती. त्यानंतर अचानक त्यांना रु. ५२,२१०/- या रक्कमेचे देयक प्रथम देण्यात आले आणि ते नंतर दुरुस्त करुन त्यांना रु. २२,८४०/- चे देयक देण्यात आले. दरम्यान मे-२०१६ व जून २०१६ मध्ये त्यांचे घरात नविन मीटर बसवणेत आले. तक्रारदार यांचे म्हणणे आहे की, त्यांचे वीज मिटर चालू होते, व रिडींग दाखवत होते तरीही त्यांना शून्य वीज वापराची देयके दिली जात होती. वरील प्रमाणे मोठया रक्कमेचे बिल भरण्याची त्यांची आर्थिक परिस्थिती नाही. योग्य न्याय करावा अशी त्यांची विनंती आहे.

२) वि.प. यांचे लेखी निवेदन दाखल झाले असून त्यांचे म्हणणे असे आहे की, तक्रारदार यांच्या वीज बिलात जानेवारी २००९ पासून T.D. टॅग दिला होता. जानेवारी २०१२ पासून त्यांना शून्य युनिट वापराची बिले देणेत येत होती. T.D. टॅग काढल्यानंतर मागिल कालावधीत वापरलेल्या ४७९५ युनिटचे बिल तक्रारदार यांना देणेत आले. तक्रारदार यांच्या मागणी प्रमाणे त्यांचे वीज मिटर तपासणेत आले व ते योग्य असल्याचे आढळून आले. तक्रारदार यांना दिलेले रु. २२,८४०/- चे वीज बिल बरोबर आहे असे वि.प. यांचे म्हणणे आहे.

३) सदर प्रकरणाची सुनावणी दिनांक ०८-११-२०१६ रोजी या मंचासमोर घेणेत आली. त्यावेळी तक्रारदार स्वतः उपस्थित होते व त्यांनी आपले तोंडी व लेखी निवेदन दिले. वितरण कंपनीतर्फे कार्यकारी श्री म.दे. आवळेकर हजर होते व त्यांनी त्यांचे म्हणणे सादर केले.

४) उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता व युक्तिवादांचा विचार करता खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होतात.

(१) वितरण कंपनीने तक्रारदार यांना दिलेले रु. २२,८४०/- इतक्या रक्कमेचे विज बिल योग्य व कायदेशीर आहे काय?

उत्तरः- नाही.

(२) कोणता अंतिम आदेश?

उत्तर :- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## कारणमिमांसा

५) तक्रारदार यांचा घरगुती वीज ग्राहक क्र. २५२७२१११३१३१/१ असा आहे. जानेवारी २०१२ पासून मार्च-२०१६ पर्यन्त तक्रारदार यांना शून्य युनिट वीज वापराची बिले दिली जात होती. तक्रारदार यांचे जूने वीज मिटर याची तक्रारदार यांच्या मागणीप्रमाणे तपासणी केली असता ते योग्यरित्या चालू होते आणि वीजेचा वापरही दर्शवित होते. नविन वीज मिटर दिनांक ०४-०७-२०१६ रोजी बसविणेत आले आहे.

६) तक्रारदार यांना जानेवारी २००९ पासून T.D. टॅग दिला होता. वीज मिटर वीजेचा वापर दाखवत असून सुध्दा तक्रारदार यांना शून्य युनिट वापराची देयके देण्यात येत होती. त्याबाबत तक्रारदार यांनी जरी वि.प. यांना कळविले नव्हते तरी वि.प. यांच्या सबंधित कर्मचा-यांचा निष्काळजीपणा किंवा दोष दूर होत नाही.

७) तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे दिनांक ११-०७-२०१६ रोजी गा-हाणे दाखल केले व त्याचा निर्णय दिनांक ३१-०८-२०१६ रोजी करण्यात आला. परंतु त्या निर्णयाने तक्रारदार यांचे समाधान झाले नाही.

८) उपलब्ध कागदपत्रा वरुन असे दिसून येते की, तक्रारदार यांना इंदिरा आवास योजने अतर्गत घरकूल मिळाले असून ते १३ फूट X २६फूट क्षेत्राचे आहे. तक्रारदार हे मजूरी करुन आपल्या कटुंबाचा चरितार्थ चालवतात.

९) वि.प. यांनी तक्रारदार यांना मागिल ५३ महिन्यांचे म्हणजे जानेवारी २०१२ ते मे-२०१६ या कालावधीचे ४७९५ युनिट वापराचे रु. २२,८४०/- या रक्कमेचे देयक दिले. सदर काळात तक्रारदार यांना शून्य युनिट वापराची देयके देण्यात आली त्याबाबत तक्रारदार यांना दोष देता येणार नाही. विद्युत कायदा २००३ च्या कलम ५६(२) प्रमाणे मागिल दोन वर्षापेक्षा अधिक कालावधीची देयके मुदतबाहय झाली आहे. तथाकथित वीज देयकांची थकबाकी उपरोक्त कालावधीत सततपणे वसूलीस पात्र दर्शवून वेळोवेळी दिलेल्या वीज देयकांमध्ये नमूद केलेली नव्हती. त्यामुळे वि.प. याना माहे जून २०१४ पासूनची वीज थकबाकी वसूल करता येईल. मे-२०१४ आणि त्यापूर्वीच्या देयकांची थकबाकी मुदतबाहय झाल्यामुळे वसूल करता येणार नाही.

१०) वि.प. यांनी तक्रारदार यांचेकडून केलेली रु. २२,८४०/- इतक्या थकबाकीची मागणी वरील कलम ५६(२) प्रमाणे पूर्णपणे कायदेशीर ठरत नाही. सदरचा तक्रार अर्ज अंशतः मंजूर करणे क्रमप्राप्त होणार आहे. जून-२०१६ जुलै-२०१६ नंतर दिली जाणारी वीज देयके नियमितपणे भरणे तक्रारदार यांची जबाबदारी आहे. त्यांचे घरात नविन वीज मिटरही बसविणेत आले आहे.

शेवटी खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येत आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांचा तक्रार अर्ज खालील प्रमाणे अंशतः मंजूर करणेत येत आहे.

२) माहे जून-२०१४ पासून दोन वर्षाच्या कालावधीचे म्हणजे मे-२०१६ पर्यन्त तक्रारदार श्री रामचंद्र बाळू सुतार रा.गौरवाड, ता. शिरोळ. जि. कोल्हापूर (ग्राहक क्र. २५२७२१११३१३१/१ यांनी वापर केलेल्या वीजेच्या बिलाची एकत्रित आकारणीची रक्कम निश्चित करुन त्यांचे देयक तक्रारदार यांना वि.प. वितरण कपंनी यांनी द्यावे असा वि.प. यांना आदेश देणेत येतो.

३) वरील प्रमाणे तक्रारदार यांना वीज देयक मिळालेल्या दिनांकापासून पंधरा दिवसांमध्ये त्यांनी देयकातील रक्कमेचा संपूर्ण भरणा वि.प. यांचेकडे करावा. अन्यथा सदर देयकातील रक्कमेवर जून-२०१६ पासून तक्रारदार यांना द.सा.द.शे. १८ प्रमाणे सरळ व्याजासह सदर रक्कमेचा भरणा करावा लागेल.

४) अंतर्गत तक्रार निवारण कक्ष,कोल्हापूर यांनी दोषी कर्मचा-या विरुध्द कारवाई करणेत यावी असा जो आदेश दिनांक ३१-०८-२०१६ रोजी दिला आहे, तो कायम करणेत येत आहे.

५) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

६) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |